Estd.1962
NAAC 'A++' Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय: शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या नियोजनाबाबत. (डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेस)**

शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील मार्च/एप्रिल, 2022 उन्हाळी सत्रातील डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेस इ. अभ्यासक्रमाच्या परीक्षा विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार ऑफलाईन (कोविडपूर्व) पध्दतीने प्रत्यक्ष केंद्रावर हजर राहून घेण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेस अभ्यासक्रमाच्या परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर ऑफलाईन MCQ पध्दतीने OMR तंत्रज्ञानाने प्रत्यक्ष केंद्रावर हजर राहून घेण्यात याव्यात.
2. उपरोक्त परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू (MCQ) पध्दतीने 50 गुणांची ( 25 प्रश्न प्रत्येकी 2 गुण), एक तास कालावधीची घेण्यात यावी.
3. उपरोक्त परीक्षा दि. 11 जुलै, 2022 ते दि. 21 जुलै, 2022 या कालावधीमध्ये घेण्यात याव्यात.
4. सदर परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर ऑफलाईन MCQ पध्दतीने होणार असल्याने ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्याच विषयाच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालातील/अधिविभागातील शिक्षकाकडून तयार करून घेण्यात याव्यात.
5. सदर परीक्षेसाठी आवश्यक OMR Sheet गोडावून विभाग, परीक्षा भवन कं. 2 यांचेकडून प्राप्त करून घेण्यात याव्यात.
6. उपरोक्त परीक्षेचे वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व परीक्षेचे नियोजन करून सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्याबाबतची कार्यवाही संबंधीत महाविद्यालय/अधिविभाग यांनी करणेची आहे.
7. महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेची आहे.
8. वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

(डॉ. अजितसिंह जाधव)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/248
दि. 07/07/2022
प्रतः

1. मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख
   सर्व सलंग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/अधिविभाग
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
4. इंटरनेट विभाग – सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यासाठी

D/March 2022 Exam/Letter1